नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १५/०३/२०२६ (रविवार )

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस शिपाई भरती २०२४ —२५ लेखी लेखी परीक्षा नियमबध्द पध्दतीने यशस्वीरित्या पार पडली

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती सन २०२४—२५ अंतर्गत लेखी परीक्षा दिनांक १५/०३/२०२६ रोजी यशवंतराव चव्हाण, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (**YCCE**), वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपूर येथे यशस्वीरित्या पार पडली आहे. एकुण २७२ पोलीस शिपाई पदांसाठी ३९१८ उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली आहे.

सदर लेखी परीक्षा केंद्रावरील सर्व व्यवस्था सुरळीत व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी मा.श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण व्यवस्थेची आणि बंदोबस्ताची आखणी करण्यात आली होती. परीक्षेसाठी येणारे उमेदवार यांची बायोमेट्रीक तपासणी, प्रवेश प्रक्रिया, सुरक्षा व्यवस्था, तसेच परीक्षेदरम्यान नियमांचे काटेकोर पालन होईल यासाठी सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी काटेकोरपणे कर्तव्य पार पाडले. परीक्षा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची गैरप्रकार किंवा नियमभंग होऊ नये यासाठी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. परीक्षा केंद्रावर आलेल्या सर्व उमेदवारांची काटेकोर तपासणी करण्यात आली असून कोणत्याही

प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी संपूर्ण परीक्षा केंद्र परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून देखरेख ठेवण्यात आली होती. तसेच परीक्षेनंतर वाहतुक नियोजनासाठी सुध्दा योग्य बंदोबस्त नेमण्यात आला होता. अशाप्रकारे नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस शिपाई भरती सन २०२४ —२५ लेखी परीक्षा नियमबध्द पध्दतीने यशस्वीरित्या पार पडली आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०३ गोवंश जनावरांची सुटका, देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक १४/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एका पांढ—या रंगाच्या फियाट लिनीया कार क्रं एम.एच.—०१/ए आर ४७३२ मध्ये सालईकडुन हिवराबाजार कडे अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सालई ते तुमसर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान फियाट लिनीया कार क्रं एम.एच. —०१/ए आर ४७३२ येताना दिसली. नमुद कार चालकाने पोलीसांना पाहुन नाकाबंदी पासुन काही अंतरावर कार थांबवुन पळुन गेला. पोलीसांनी त्याचा पाठलाग केला परंतु तो अंधराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता कारमध्ये ३ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून फियाट लिनीया कार क्रं एम.एच.—०१/ए आर ४७३२ किंमती ३,००,०००/— रूपये आणि ०३ गोवंश जनावरे किंमती ४५,०००/—रूपये असा एकुण ३,४५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी  फियाट लिनीया कार क्रं एम.एच.—०१/ए आर ४७३२ चा चालक व मालक यांचेविरूद्ध कलम २८१ भा.न्या.सं. सहकलम ११(१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतीबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ), (९) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम १८४ मोवाका., सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १२ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ११ मोबाईल, ७ मोटर सायकल आणि रोख रकमेसह सह ८ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त,काटोल पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक १४/०३/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा खुटांबा येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) वसिम ईब्राहीम मुसानी, वय ४२ वर्ष, रा. कोढाळी ता. काटोल २) शेख ईलाईज शेख गुलजार, वय ७६ वर्ष, रा. उमाठे नगर कोढांळी ३) विजय बाबाराव ढोके, वय ३५ वर्ष रा. धोतीवाडा, ता. काटोल ४) बलराम हरिसिंग चव्हान, वय ४९ वर्ष वसंतनगर, कोढाळी ता. काटोल  ५) वसिम शेख सलिम शेख, वय ३५ वर्ष रा. कोढाळी ता. काटोल ६) गुड्डु रुपराव मारवाडी, वय ३२ वर्ष रा.डोंगरगाव काटोल ७)विशाल दर्याजी सोलंकी, वय २७ वर्ष, रा. फेटरी ता. काटोल ८) प्रकाश चिधुजी कावडे, वय ४६ वर्ष रा. पेठबुधवार, काटोल ता. काटोल ९)सुधाकर गणुजी मरसकोल्हे, वय ५२ वर्ष रा. वाघोडा ता. काटोल १०) संदिप शालीकराम रेवतकर, वय ४६ वर्ष रा. हनुमान मंदिर जवळ आय.यु.डी.पी. कॉलोनी काटोल ११) शिवदास दामु राजपुत, वय ३९ वर्ष रा. खानगाव ता. काटोल १२) ज्ञानेश्वर पांढुरंगजी कोहळे वय ५२ वर्ष रा. संबकुंड ता. काटोल** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले.

आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते,नगदी १६,५५०/—रुपये, विविध कंपनीचे ११ मोबाईल फोन, विविध कंपनीच्या ०७ मोटर सायकली असा एकुण किंमती ८,३४,६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द

पोलीस स्टेशन काटोल येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा सह कलम ४९ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन नरखेड :— दिनांक १४/०३/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटर सायकलने **अवैधरीत्या देशी दारूची**

**वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा सावरगाव येथे नाकाबंदी केली असता मोटर सायकल क्र एम एच ३१ के. आर २३९८ ही मिळुन आली. आरोपी नामे १) **प्रदिप नामदेव गायधणे, वय ३४ वर्षे, रा. मसोरा. ता. नरखेड हा अवैधरित्या दारू वाहतुक करतांना मिळुन आला. त्याला मिळुन आलेल्या देशी दारू बाबत अधिक विचारपुस केली असता त्याने माहीती दिली की सदर दारू सावरगाव येथील मोरू जयस्वाल. याचेकडुन आणली असुन आरोपी क्रं ०३) रामहरी चिंतामण देशभ्रतार. रा. सिदी. ता. नरखेड याचेकडे घेवुन जात आहे.**

पोलीसांनी पंचासमक्ष १) ९० एम एल क्षमतेच्या देशी दारूचे २०० निपा किंमती ८०००/— रूपये आणि मोटर सायकल क्र एम एच ३१ के.आर २३९८ किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण ३८,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने